**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार, दिनांक २८ मार्च २०२४**

**ठळक बातम्या**

- **लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याला आजपासून सुरुवात: विदर्भातील बुलडाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ - वाशिम आणि वर्धा या लोकसभा मतदारसंघांचा समावेश.**
- **रामटेक लोकसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार रश्मी बर्वे यांचं जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीनं ठरविलं अवैध.**
- **महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर रात्रभर पोलिस-नक्षल चकमक: मोठ्या प्रमाणात नक्षल साहित्य जप्त.**
- **चालू शैक्षणिक वर्षांपासून पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केवळ राष्ट्रीय पात्रताचाचणीचे गुण ग्राह्य धरावेत: विद्यापीठ अनुदान आयोगाचे निर्देश.**

*****

लोकसभा दुसरा टप्पा

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याला आजपासून प्रारंभ झाला. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून याबाबतची अधिसूचना जारी केल्यानंतर, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया आज सुरू होईल. या दुसऱ्या टप्प्यात १२ राज्यांमधल्या ८९ लोकसभा मतदारसंघांसाठी २६ एप्रिलला मतदान होणार आहे. यामध्ये विदर्भातील बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ-वाशिम आणि वर्धा या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या सर्व मतदारसंघात आजपासून चार एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत, तर आठ एप्रिलपर्यंत अर्ज मागं घेता येणार आहेत. आजपासून सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत शासकीय सुट्टी वगळता येत्या ४ एप्रिलपर्यंत सर्व दिवस उमेदवारांना नामनिर्देशनपत्र दाखल करता येतील. दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली. या टप्प्यात विदर्भातल्या पाचही मतदारसंघांतून १८३ उमेदवारांनी २२९ अर्ज दाखल केले आहेत. यामध्ये रामटेक मतदारसंघातून एकेचाळीस जणांचे एकावन्न अर्ज, नागपूर इथून चोपन्न जणांचे बासष्ठ अर्ज, भंडारा-गोंदिया इथून चाळीस जणांचे एकोणपन्नास अर्ज, गडचिरोली-चिमूर इथून बारा जणांचे एकोणीस अर्ज, तर चंद्रपूर मतदारसंघातून छत्तीस जणांचे अठ्ठेचाळीस अर्ज दाखल झाले आहेत.

या सर्व दाखल उमेदवारी अर्जांची आज छाननी होणार असून, येत्या तीस तारखेपर्यंत अर्ज मागं घेता येणार आहेत.

रश्मी बर्वे-जात प्रमाणपत्र

रामटेक लोकसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज काल रामटेक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडं दाखल करणाऱ्या रश्मी बर्वे यांचं जात प्रमाणपत्र राज्य सरकारच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या जात पडताळणी समितीकडून अवैध ठरविण्यात आलं आहे. बर्वे यांच्या जात प्रमाणपत्रावर भाजप नेत्यांनी आक्षेप घेतला होता. त्यानंतर हे प्रकरण जिल्हाधिकारी यांच्या मार्फत सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या जात पडताळणी समितीकडं पाठविण्यात आलं होतं. काल अर्ज दाखल केल्यानंतर आज त्यांचं जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आलं आहे.

राष्ट्रवादी स्टार प्रचारक

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वतीनं महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीसाठी ३७ जणांची स्टार प्रचारक यादी राष्ट्रीय सरचिटणीस एस. आर. कोहली यांनी जाहीर केली आहे. या स्टार प्रचारक यादीमध्ये राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, विधानपरिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर, कृषी मंत्री धनंजय मुंडे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न आणि औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम आदींचा प्रामुख्यानं समावेश आहे.

नवनीत राणा

अमरावतीच्या अपक्ष खासदार नवनीत राणा यांनी काल नागपूर इथं प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कोराडीस्थित जनसंपर्क कार्यालयामध्ये भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. राणा अमरावती लोकसभा मतदारसंघातून भाजपाच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढविणार आहेत. बडनेराचे आमदार रवी राणा, भंडाऱ्याचे उमेदवार सुनील मेंढे, अमरावती भाजपा शहर अध्यक्ष आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्यासह अमरावती जिल्ह्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

संजय गायकवाड

बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याचा आजचा पहिला दिवस असून आज शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी खासदारकीसाठी पहिला अर्ज दाखल केला आहे. परंतु शिवसेना शिंदे गटाच्या वतीनं अधिकृत उमेदवाराची घोषणा अद्याप झालेली नसताना संजय गायकवाड यांनी शिवसेना पक्षातर्फे आणि एक अपक्ष असे 2 अर्ज भरल्यानं राजकीय गोटात खळबळ उडाली आहे. बुलढाणा लोकसभा मतदार संघासाठी आज २७ उमेदवारांनी ६७ अर्ज नेले आहेत. अमरावती अनुसूचित जाती लोकसभा मतदारसंघात आज व्यंकटेश महास्वामी कटकधोंड यांनी आपलं एक नामनिर्देशनपत्र दाखल केलं. शिवसेना एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे माजी आमदार कॅप्टन अभिजित अडसूळ यांच्यासह आज ४३ व्यक्तींनी ७५ नामनिर्देशन अर्ज खरेदी केले.

शिवजयंती

फाल्गुन वद्य तृतीया ही छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार साजरी होणारी जयंती आज विविध ठिकाणी मोठ्या उत्साहानं साजरी होत आहे. शिवाजी महाराजांचं जन्मस्थळ असलेल्या किल्ले शिवनेरीवर विविध सामाजिक संस्थांनी तसंच गड किल्ले संवर्धक मंडळांनी शिवजयंती साजरी केली. मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळावरच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी, तर शिवाजी पार्क इथल्या अश्वारूढ पुतळ्याला राज ठाकरे यांनी अभिवादन केलं.

पोलिस-नक्षल्यांमध्ये-चकमक

गडचिरोली आणि छत्तीसगड राज्याच्या सीमावर्ती भागातील भूमकान गावानजीकच्या जंगलात काल रात्रभर पोलिस आणि नक्षल्यांमध्ये जोरदार चकमक झाली. पोलिसांनी घटनास्थळावरुन नक्षल साहित्य ताब्यात घेतलं आहे.लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घातपात करण्याच्या हेतूनं कसनसूर, चातगाव दलम आणि छत्तीसगडमधील औंधी दलमचे नक्षलवादी एटापल्ली तालुक्यातील भूमकान गावानजीकच्या जंगलात एकत्र आले होते. त्यानंतर अतिरिक्त पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या नेतृत्वात सी-६० पथक आणि केंद्रीय राखीव दलाच्या जलद प्रतिसाद पथकाच्या जवानांना त्या भागात पाठविण्यात आलं. संध्याकाळी ६ वाजतापासून रात्री ११ वाजतापर्यंत पोलिस आणि नक्षल्यांमध्ये चकमक झाली. नक्षल्यांनी पोलिसांवर बॅरल ग्रेनेड लाँचरचा मारा केला. मात्र, पोलिसांनी जोरदार प्रत्युतर देऊन हल्ला परतवून लावला. त्यानंतर पुन्हा मध्यरात्रीपासून पहाटे साडेचारपर्यंत चकमक उडाली. यात कुणीही जखमी झालं नसून

नक्षलवादी अंधाराचा फायदा घेत जंगलात पसार झाले. आज सकाळी पोलिसांनी घटनास्थळावरुन बंदूक, बॅटरी, वायर, पिट्टू आणि अन्य साहित्य ताब्यात घेतलं. पोलिस त्या भागात अजूनही नक्षलविरोधी अभियान राबवीत असल्याचं पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितलं.

पीएचडीसाठी प्रवेश परीक्षा

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षांपासून सर्व विद्यापीठांनी पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केवळ नेट स्कोअर, म्हणजेच राष्ट्रीय पात्रता चाचणीचे गुण ग्राह्य धरावेत, असे निर्देश युजीसी, अर्थात विद्यापीठ अनुदान आयोगानं दिले आहेत. त्यानुसार २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांपासून पीएचडी अभ्यासक्रमासाठी विविध विद्यापीठं आणि उच्च शिक्षण संस्थांच्या प्रवेश परीक्षांऐवजी केवळ नेट परीक्षेचा निकाल ग्राहय धरला जाईल, असं यूजीसीचे अध्यक्ष एम जगदेश कुमार यांनी समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये लिहिलं आहे. जून २०२४ च्या शैक्षणिक सत्रासाठी नेट परीक्षेच्या अर्ज प्रक्रियेवर राष्ट्रीय चाचणी संस्था काम करत असून, पुढल्या आठवड्यात याबाबतची माहिती उपलब्ध होईल, असं यात म्हटलं आहे.

आचारसंहिता भंग

अकोल्यात जिल्हाधिकारी कार्यालयापासून १०० मीटरच्या आत प्रचाराचा मजकूर असलेली वाहनं उभी केल्याबद्दल दोघांविरुद्ध सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात आचारसंहिता भंगाची तक्रार दाखल करण्यात आली आहे. अकोला पश्चिम मतदार संघातील भरारी पथक क्रमांक ५ चे प्रमुख नीलेश बायस्कर यांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली होती. या वाहनांना परवानगी प्राप्त नसल्यानं तसंच प्रचार मजकूर असलेलं वाहन निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयाच्या परिसरात आणल्यानं आचारसंहितेचा भंग झाला असून, भारतीय दंडसंहितेनुसार गुन्हा नोंदवावा, अशी लेखी तक्रार पथकप्रमुख बायस्कर यांनी छायाचित्रणाची सीडी, वाहनचालकांचं आधारपत्र आणि माहितीसह दाखल केली. त्यानुसार गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली.

राष्ट्रीय पुरस्कार

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगातर्फे आयोजित, नवव्या राष्ट्रीय लघुपट स्पर्धेत 'ऱ्हास' या मराठी लघुपटाला राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. भारतातील एकूण १३९ लघुपटांतून 'ऱ्हास' या एकमेव लघुपटाची महाराष्ट्रातून निवड झाली आहे.

## कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीनं फ्रान्स येथील कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव फिल्म मार्केटकरिता शशी खंदारे दिग्दर्शित 'जिप्सी', श्रीकांत भिडे दिग्दर्शित 'भेरा' आणि मनोज शिंदे दिग्दर्शित 'वल्ली' या तीन चित्रपटांची निवड झाल्याची माहिती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.अविनाश ढाकणे यांनी आज दिली. फ्रान्स देशातील कान इथं दिनांक १४ ते २२ मे या कालावधीत हा महोत्सव संपन्न होणार आहे. महामंडळामार्फत सन २०१६ पासून कान महोत्सवातील फिल्म मार्केटमध्ये मराठी चित्रपट पाठविले जात आहेत. मराठी चित्रपट आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचावा आणि आंतरराष्ट्रीय दर्शकांनाही मराठी चित्रपटांची भुरळ पडावी, हा या मागचा हेतू आहे. यावर्षी एकूण २३ चित्रपटांचे प्रवेश प्राप्त झाले होते. त्यातून तीन चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. या चित्रपट निवड समितीमध्ये श्रीकांत बोजेवार, रसिका आगाशे, अर्चना बोऱ्हाडे, क्षितिजा खंडागळे, संदीप पाटील यांचा समावेश होता. या समितीनं तिन्ही चित्रपटांची निवड एकमतानं केली आहे.

## उष्माघात प्रतिबंध

नागपूर महानगरपालिका मुख्यालयात मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी उष्माघात प्रतिबंध आणि नियंत्रण उपाययोजनेच्या कृती आराखडा नियोजनाबाबत आढावा घेतला होता. त्यावेळी आयुक्तांनी केलेल्या सूचना आणि दिलेल्या निर्देशानुसार क्रीडा आणि सांस्कृतिक अधिकारी डॉ. पीयूष आंबुलकर यांनी संघटनांना सूचना दिल्या आहेत.

*****